ePaper
| वर्ष - 8 | अंक - 362 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™

# प्रांजल खेवलकरांचा पाय आणखी खोलात, अडचणी वाढणार



## आतील पानांत


- मुंबईने घडवले, हे विसरू नकोस!
- सिराजबाबत खबरदारी गरजेची!
- TRP चा उच्चांक, सगळे रेकॉर्ड मोडले!
- शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड नाही!


www.mahaenews.com | रविवार, दि.10 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## कोणताही घोटाळा नाही

## ‘सावत्र भावां’पासून सावध राहा–मुख्यमंत्री फडणवीस

# लाडकी बहीण योजना पाच वर्षे सुरु राहणार!

## गैरफायदा रोखण्यासाठी पडताळणी सुरू

### पात्र लाभार्थींना पुन्हा निधी सुरू होणार–एक कोटी ‘लखपती दीदी’ तयार करण्याचा निर्धार

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**“लाडक्या बहिणींमुळेच आम्ही सत्तेवर आलो असून तुमच्या सामाजिक आणि आर्थिक रक्षणासाठी आम्ही सर्व भाऊ सतत कार्यरत आहोत. ही योजना यापुढेही सुरू राहील आणि योग्य वेळी मानधनात वाढही केली जाईल,” अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने दिली.**

मुलुंड येथील कालिदास नाट्यगृहात आयोजित रक्षाबंधन सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी पालकमंत्री आशिष शेलार, आमदार मिहिर कोटेचा आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.



फडणवीस यांनी स्पष्ट केले की, लाडकी बहीण योजनेत कोणताही घोटाळा झालेला नाही. उलट, काहींनी या योजनेचा गैरफायदा घेतल्याचे आढळले असून अशा लोकांचे पैसे थांबवण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी स्तरावर फेरतपासणी सुरू असून, पात्र ठरणाऱ्या महिलांना निधी पुन्हा सुरू केला जाईल.

### विरोधकांवर टीका आणि ‘सावत्र भावां’चा इशारा

मुख्यमंत्री फडणवीस यांनी भाषणात विरोधकांवर निशाणा साधत म्हटले – “काही ‘सावत्र भाऊ’ या योजनेत अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आहेत. काही जण न्यायालयात गेले, काहींनी भ्रष्टाचाराचे आरोप केले. पण या योजनेतील निधी थेट बहिणींच्या खात्यात जातो; मध्ये कुणालाही लाभ नाही. एवढी मोठी अडीच कोटी महिलांची योजना भ्रष्टाचाराशिवाय होऊ शकते, हे काहींना पचत नाही.”

त्यांनी पुढे हसत-हसत म्हटले – “सावत्र भाऊ जोपर्यंत सावत्र सारखे वागतात, तोपर्यंत बहिणी त्यांना कधीच थारा देणार नाहीत.”

एक कोटी ‘लखपती दीदी’चा संकल्प फडणवीस यांनी सांगितले की, काही पुरुषांनी महिलांच्या नावावर निधी घेतला, तर काहींनी आपली ओळख लपवण्यासाठी मोटरसायकलचा फोटोही लावला. असे सर्व प्रकरणे शोधून पैसे रोखण्यात आले आहेत.

मात्र, एखाद्या पात्र लाभार्थीचे पैसे चुकीने थांबले असतील तर ते त्वरित सुरू करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार दहा जिल्ह्यांमध्ये बचत गटांचे मॉल उभारणार आहे. येथे महिलांना मोठ्या प्रमाणात विक्रीची संधी मिळेल.

मागील वर्षी २५ लाख ‘लखपती दीदी’ तयार केल्या असून यावर्षीही तेवढ्याच महिलांना ‘लखपती’ बनवण्याचे उद्दिष्ट आहे. येत्या काही वर्षांत एक कोटी ‘लखपती दीदी’ तयार करण्याचा निर्धारही सरकारने व्यक्त केला आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही

- लाडकी बहीण योजना पाच वर्षे सुरू राहणार
- योग्य वेळी मानधनात वाढ होणार
- पात्र महिलांना निधी पुन्हा सुरू
- ‘सावत्र भावां’पासून सावध राहण्याचा इशारा

### योजनेंतील कारवाई

- गैरफायदा घेणाऱ्यांची प्रकरणे शोधून निधी थांबवला
- जिल्हाधिकारी स्तरावर फेरतपासणी सुरू
- पात्र लाभार्थींना त्वरित पैसे सुरू करण्याचे आदेश
- पुरुषांनी घेतलेले पैसे परत मिळवण्याची मोहीम

### महिलांसाठी विकास योजना

- दहा जिल्ह्यांमध्ये बचत गटांचे मॉल उभारणी
- विक्रीसाठी महिलांना मोठा बाजारपेठ उपलब्ध
- २५ लाख ‘लखपती दीदी’ तयार (2024)
- लक्ष्य – एक कोटी ‘लखपती दीदी’ (भावी योजना)

**हद्दवाढ शक्य**

## नवीन महानगरपालिका, हद्दवाढ ३१ डिसेंबरपर्यंतच शक्य

# पवारांच्या प्रस्तावावर मंजुरीची प्रतिक्षा

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे परिसरातील झपाट्याने झालेले नागरीकरण लक्षात घेता तीन महानगरपालिका स्थापन करण्याची योजना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली असली तरी जनगणनेच्या प्रक्रियेमुळे नवीन महानगरपालिका वा हद्दवाढ ३१ डिसेंबरपूर्वी पूर्ण करावी, अन्यथा मार्च २०२७ पर्यंत काहीही बदल करता येणार नाहीत, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.**

## जनगणना प्रक्रियेमुळे खोळंबा!



पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका सध्या अस्तित्वात आहेत. वाढते नागरीकरण लक्षात घेता पुणे परिसरात हिंजवडी, चाकण आणि उरुळी देवाची, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि वाघोली या भागासाठी स्वतंत्र अशा तीन महानगरपालिका स्थापन करण्याची आवश्यकता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. अर्थात, पवारांच्या या प्रस्तावाला शिवसेना शिंदे गट आणि भाजपचा पाठिंबा नाही. यामुळेच अजितदादांनी घोषणा केली त्याच दिवशी पुणे दौऱ्यावर असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीनऐवजी एक नवीन महानगरपालिका स्थापन करण्याचा विचार करता येईल, असे विधान करीत वेगळा सूर लावला.जनगणनेची प्रक्रिया एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या काळात राबविली जाणार आहे. २०२६ मध्ये घरांची नोंदणी, एकूण किती घरे आहेत, घरात फोन, इंटरनेट वगैरे माहिती गोळा केली जाईल. १ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती गोळा करतील. १ मार्च २०२७ या दिवशी १६व्या जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. जनगणनेची ही सारी प्रक्रिया लक्षात घेता ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी नवीन महानगरपालिका, हद्दवाढ, जिल्हा किंवा तालुक्यांच्या सीमांमध्ये बदल करायचा असल्यास करावा, असा आदेशच ‘रजिस्टर जनरल ऑफ इंडिया’ने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना दिला आहे.१ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सव्वा वर्षाच्या कालावधीत जिल्हा, तालुका वा महानगरपालिकांच्या सीमांमध्ये बदल करता येणार नाही. यामुळेच अजित पवारांनी सुचविलेल्या तीन महानगरपालिकांची स्थापना डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करावी लागेल अथवा २०२७ नंतरच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागेल.राज्यात नवीन जिल्हे व तालुक्यांच्या निर्मितीची अनेक वर्षांची मागणी आहे. राज्यात १ ऑगस्ट २०१४ मध्ये पालघर या राज्यातील ३६व्या

### जिल्हा विभाजन रखडले

सीमांमध्ये बदल करता येणार नाही. यामुळेच अजित पवारांनी सुचविलेल्या तीन महानगरपालिकांची स्थापना डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करावी लागेल अथवा २०२७ नंतरच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागेल.राज्यात नवीन जिल्हे व तालुक्यांच्या निर्मितीची अनेक वर्षांची मागणी आहे. राज्यात १ ऑगस्ट २०१४ मध्ये पालघर या राज्यातील ३६व्या जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली.

जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर गेल्या ११ वर्षांमध्ये जिल्हा विभाजन वा नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात आलेली नाही. राज्यात गेल्या वर्षी जालना महानगरपालिकेची स्थापना झाल्याने महापालिकांची संख्या २९ झाली आहे.पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका सध्या अस्तित्वात आहेत. वाढते नागरीकरण लक्षात घेता पुणे परिसरात हिंजवडी, चाकण आणि उरुळी देवाची, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि वाघोली या भागासाठी स्वतंत्र अशा तीन महानगरपालिका स्थापन करण्याची आवश्यकता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. अर्थात, पवारांच्या या प्रस्तावाला शिवसेना शिंदे गट आणि भाजपचा पाठिंबा नाही. यामुळेच अजितदादांनी घोषणा केली त्याच दिवशी पुणे दौऱ्यावर असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीनऐवजी एक नवीन महानगरपालिका स्थापन करण्याचा विचार करता येईल, असे विधान करीत वेगळा सूर १ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती गोळा करतील. १ मार्च २०२७ या दिवशी १६व्या जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.जनगणनेची ही सारी प्रक्रिया लक्षात घेता ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी नवीन महानगरपालिका, हद्दवाढ, जिल्हा किंवा तालुक्यांच्या सीमांमध्ये बदल करायचा असल्यास करावा, असा आदेशच ‘रजिस्टर जनरल ऑफ इंडिया’ने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना दिला

# बस बंद पडल्यास अर्ध्या दिवसाची वेतन कपात

## ‘पीएमपी’च्या अध्यक्षांचा आदेश; कर्मचारी संघटनांचा विरोध

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) मालकीच्या बस बंद पडल्यास देखभाल दुरुस्ती अभियंता आणि चालक यांची अर्ध्या दिवसाची वेतन कपात केली जाणार आहे. पीएमपीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी याबाबतचा आदेश दिला आहे. हा निर्णय ‘पीएमपी’च्या मालकीच्याच बससाठी घेण्यात आला असून, ठेकेदारांच्या बसबाबत उल्लेख नसल्याने कामगार संघटनेने विरोध केला आहे.**



त्यामुळे देवरे यांचा आणखी एक निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.पीएमपीच्या ताफ्यात स्वमालकीच्या ९६४, तर कंत्राटी १०१९ अशा मिळून एकूण १९८३ ‘पीएमपी’च्या आहेत. त्यापैकी स्व:मालकीच्या ७३७ बसची वेगवेगळ्या आगारांमध्ये दुरुस्ती सुरू आहे. त्यामध्ये तांत्रिक दुरुस्ती, मार्गिकेवर अचानक बंद पडणे, बिघाड यांमुळे फेऱ्या रद्द करण्यात येत आहेत. त्याचा फटका पीएमपीच्या उत्पन्नावर होत आहे. हे प्रमाण कमी करून प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्यासाठी बस बंद पडण्याच्या घटनांबाबत दखल घेण्यात आली आहे. त्यानुसार देखभाल दुरुस्ती विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी देवरे यांनी सूचना केल्या आहेत.‘ब्रेकडाऊन’ संदर्भातील उपाययोजना म्हणून बस संचलनात पाठविण्यापूर्वी विभागीय देखभाल दुरुस्ती अभियंता यांनी दुरुस्तीच्या कामांची पूर्तता झाली आहे किंवा नाही याची खात्री करावी. बस मार्गावर न्यावी. संचलनादरम्यान बस बंद पडल्यास अभियंता आणि चालक यांच्या वेतनातून अर्ध्या दिवसाची वेतन कपात केली जाईल.

### कारवाई केल्यास हरकत नाही

असे देवरे यांनी आदेशात नमूद केले आहे. हा निर्णय पीएमपीच्या ताफ्यातील स्व:मालकीच्या ७३७ बससाठी आहे. कंत्राटदारांच्या पीएमपीबाबत उल्लेख नाही. त्यामुळे कर्मचारी संघटनांनी विरोध केला आहे.संचलनातील बस बंद पडणे ही तांत्रिक बाब आहे. एखादी गाडी दुरुस्त करूनही बंद पडली, तरी नियमानुसार प्राथमिक चौकशी होणे अपेक्षित आहे. चौकशीअंती कारवाई केल्यास हरकत नाही.

## जलवाहिनीचे काम संथगतीने | प्रस्तावाला आयुक्तांनी स्थायी समिती मान्यता

# भामा आसखेड प्रकल्पाच्या खर्चात वाढ

## उच्चदाब वीज खांब हटविण्यासाठी सव्वा दोन कोटींचा वाढीव खर्च

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे काम संथगतीने सुरू असताना कामाच्या खर्चातही विविध कारणामुळे वाढ होत आहे. जलवाहिनी टाकण्याच्या कामाला अडथळा ठरणारे उच्चदाब वीज खांब हटविण्यासाठी 2 कोटी 31 लाख 55 हजार 267 रूपयांचा खर्च करण्यात येणार आहे. याबाबतच्या प्रस्तावाला आयुक्तांनी स्थायी समिती मान्यता दिली.**



पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या पाहता महापालिकेने आंद्रातून शंभर आणि भामा आसखेड धरणातून 167 असे 267 एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन केले. यासाठी धरणातून जलवाहिनीद्वारे पाणी आणण्यासाठी महापालिकेने 2020 मध्ये निविदा प्रक्रिया राबवून जलवाहिनी टाकण्याचे काम ऑफशोअर इंडिया लि. या ठेकेदाराला दिले. या कामाची चार वर्षांची मुदत संपली तरी हे काम अपूर्णच आहे. या जलवाहिनीचे काम 60 टक्केच पूर्ण झाले आहे. नवलाख उंब्रेपासून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलवाहिनी टाकण्यात येत आहे. जलवाहिनीचे संपूर्ण काम 162 कोटी रूपयांचे आहे. याचा कार्यारंभ आदेश 15 डिसेंबर 2020 रोजी दिला होता. कामाची मुदत 15 डिसेंबर 2024 अशी चार वर्षांची होती. मात्र, या मुदतीत काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे ठेकेदाराला 31 डिसेंबर 2025 अशी एक वर्षाची मुदत दिली आहे. मात्र, या मुदतीतही काम पूर्ण होण्याची शक्यता नसल्याचे पाणी पुरवठा विभागातील अधिका-यांनी सांगितले. त्यामुळे ठेकेदाराला पुन्हा मुदतवाढ द्यावी लागणार आहे.

**300 उच्चदाब खांब हलविणार**

खेड येथील वाकीतर्फे वाडा येथील अशुद्ध जलउपसा केंद्रापासून इंदोरीपर्यंत जलवाहिनीच्या कामाला 300 उच्चदाब खांब अडथळा ठरत आहेत. हे खांब हलविण्यासाठी महापालिकेने तीन कोटी चार लाख 63 हजार 448 रुपयांची निविदा प्रसिद्ध केली होती. या निविदा प्रक्रियेत सात ठेकेदारांनी सहभाग घेतला. त्यापैकी एक निविदा अपात्र ठरली. इलेक्ट्रो मॅक्यनिक्स या ठेकेदाराने 23.99 टक्के कमी दाराची निविदा दिली. ही निविदा स्विकारून त्यांच्याकडून 2 कोटी 31 लाख 55 हजार 267 रूपयांमध्ये काम करून घेण्यास आयुक्तांनी स्थायी समितीची मान्यता दिली.

**आंद्रा धरणाच्या जलवाहिनी कामाला अद्यापही सुरुवात नाही**

आंद्रा धरणातील पाणी नवलाख उंब्रे येथून एकाच जलवाहिनीतून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत आणण्यात येणार आहे. तिथपर्यंत साडेसात किलोमीटर जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. परंतु, या कामाला अद्याप सुरुवात झाली नाही. सध्या इंद्रायणी नदीतून निघोजे बंधा-यातून पाणी उचलले जाते.

> “ भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेतील जलवाहिनीला अडथळा ठरणारे उच्चदाब खांब हलविण्यात येणार आहेत. त्यासाठी जिथे अडथळा येईल, तेथील खांब हटविण्यात येणार आहेत.
> **-अनिल भालसाखळे,** सह शहर अभियंता, विद्युत विभाग.

### एकूणच, काम संथ गतीने...

पिंपरी-चिंचवड शहरासाठी भामा आसखेड धरणातून पाणीपुरवठा करण्याचे जलवाहिनी प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरू आहे. इंदोरी ते वाकीतर्फे वाडा मार्गावरील 300 उच्च दाब वीजखांब हलविण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने 3 कोटी 4 लाख 63 हजार 448 रुपयांची निविदा काढली असून, त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात आणखी वाढ झाली आहे.2020 मध्ये ‘ऑफशोअर इंडिया लि.’ या ठेकेदाराला दिलेल्या 162 कोटी रुपयांच्या जलवाहिनी प्रकल्पाची मुदत डिसेंबर 2024 पर्यंत होती, मात्र 19 पैकी फक्त 9 किमीचे काम पूर्ण झाले आहे. नवलाख उंबरेपासून चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत 7.5 किमी जलवाहिनीचे काम अद्याप सुरू झालेले नाही.

---

# विद्यार्थ्यांनी जवानांसाठी पाठवल्या राख्या

## शिक्षण विश्व: इंद्रायणीनगर शाळेतील मुलांचा अनोखा उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या भोसरी येथील इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेत देशप्रेम, सर्जनशीलता आणि पर्यावरणपूरकता यांचा सुंदर संगम घडवणारा आगळा वेगळा उपक्रम राबवण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी लेह लडाखमधील आपल्या वीर जवानांसाठी स्वतः हाताने राख्या तयार करून पाठवल्या आहेत.**



हा उपक्रम आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, प्रशासनाधिकारी संगीता बांगर यांच्या संकल्पनेतून व शाळेच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला आहे. उपक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका आणि माजी मुख्याध्यापिका शैला मातेरे यांचा विशेष सहभाग आहे. मातेरे या पर्यटक म्हणून लेह-लडाखला जाणार असल्याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाल्यावर त्यांनी सैनिकांसाठी राख्या तयार करण्याचा निर्णय घेतला. यासाठी विद्यार्थ्यांनी ‘टाकाऊतून टिकाऊ’ या संकल्पनेनुसार घरातील व शाळेत उपलब्ध असलेल्या टाकाऊ वस्तूंचा वापर केला. कागद, फिती, मोती, दोरे, जुनी सजावटीची साहित्ये अशा विविध वस्तूंमधून रंगीबेरंगी आणि आकर्षक राख्या तयार केल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या हस्तकला, नवनिर्मिती आणि पुनर्वापर कौशल्याला चालना मिळाली आहे .प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या लहानशा योगदानातून देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांना भावनिक संदेश देण्याचा प्रयत्न केला. सीमेवरचे जवान हेच आमचे खरे रक्षक आहेत, अशी भावना विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली.

### विद्यार्थ्यांकडून ‘टाकाऊतून टिकाऊ’ राख्या

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या भोसरीतील इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेत देशप्रेम, सर्जनशीलता आणि पर्यावरणपूरकता यांचा संगम घडवणारा आगळा-वेगळा उपक्रम राबवण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हस्तकौशल्यातून लेह-लडाखमधील वीर जवानांसाठी राख्या तयार करून पाठवल्या. हा उपक्रम आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, प्रशासनाधिकारी संगीता बांगर यांच्या संकल्पनेतून, तसेच मुख्याध्यापिका व माजी मुख्याध्यापिका शैला मातेरे यांच्या विशेष सहभागातून साकारला. ‘टाकाऊतून टिकाऊ’ या संकल्पनेनुसार कागद, फिती, मोती, दोरे आणि जुनी सजावटीची साहित्ये वापरून रंगीबेरंगी राख्या तयार करण्यात आल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या हस्तकला, पुनर्वापर आणि नवनिर्मिती कौशल्याला चालना मिळाली, तसेच देशाच्या सीमेवर तैनात जवानांना भावनिक सलाम करण्याची संधी मिळाली.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



### ज्याला समाधान तो भाग्यवान.

ज्याचे ' हवेपण ' जास्त असते तो गरीब जाणावा, आणि ज्याचे हवेपण कमी असते तो श्रीमंत जाणावा. परमार्थी म्हणजे भिकारी असे ज्याला वाटते, त्याला श्रीमंतीची खरी कल्पनाच नाही. ज्याला नेहमी समाधान वाटते तोच खरा श्रीमंत. आमचा आधार पैशाचा; तो आज आहे अन् उद्या नाही. पायाच जिथे डळमळीत तिथे इमारत कुठे पक्की होईल ? श्रीमान् याचा अर्थ भगवंताशिवाय श्री असणारा असा होऊ नये, याची श्रीमंतांनी काळजी घ्यावी. खरे म्हणजे समाधान हाच खरा पैसा, हीच खरी श्रीमंती, हेच खरे भाग्य, आणि हेच खरे ऐश्वर्य होय. ज्याला समाधान जास्त, तो जास्त भाग्यवान समजावा. समाधान हे आपले आपल्याला घ्यायचे असते, दुसरा कोणी ते आपल्याला देऊ शकत नाही. खरोखर, समाधानासारखे औषधच नाही. ते मिळत नाही म्हणून इतर औषधे घ्यावी लागतात. काळजी नाहीशी झाली की अखंड समाधान, शांती आणि आनंद मिळतो. पैलवानासारखा दिसणारा एक गृहस्थ होता, त्याला विचारले तर तो म्हणाला, " अहो, मला मधुमेह झाला आहे; मी आतून पोखरला गेलो आहे ! त्यापेक्षा तुम्ही बरे. " खरोखर, त्याचप्रमाणे पैशापासून प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्याची अवस्था आहे. फक्त भगवंताच्या निष्ठेमध्ये समाधान आहे. ते राजवाड्यामध्ये नाहीच नाही, पण ते झोपडीमध्येही नसेल. असमाधान हा रोग सर्वांनाच असल्यामुळे रोगांच्या यादीतून त्याचे नावच निघून गेले आहे ! सध्या जगात पुष्कळ सुधारणा झालेल्या आहेत. पण त्यांनी माणसाला समाधान मिळालेले नाही. जीवन सुखी न होता मनाला जिच्यामुळे हुरहुर लागते ती सुधारणा कसली ? व्यक्ती काय किंवा समाज काय, यांची सुधारणा घडवून आणायला चित्त स्थिर झाले पाहिजे. चित्ताची ही स्थिरता धर्माशिवाय येणे शक्य नाही. हल्लीचे तत्त्वज्ञान नुसते अभ्यासी आहे, अनुभवाचे नाही; म्हणून त्याने खरे समाधान लाभणार नाही. खरोखर, प्रत्येक जीवाला भगवंताची तळमळ लागली पाहिजे. भगवंताशिवाय जो राहतो त्याला सुखदुःख येते; आणि सुख म्हणजे तरी काय, दुःखाची कमतरता ते सुख ! राजापासून रंकापर्यंत प्रत्येकाला काहीतरी मिळावेसे वाटते; म्हणजे प्रत्येकाला काहीतरी कमी आहे. पण कुणी असा विचार करीत नाही की, जे आज कमी आहे ते पूर्वी आपल्याजवळ असताना तरी आपण सुखी होतो का ? याचे उत्तर ' नाही ' असेच मिळते. ताजी जिलबी कल्पनेने खाण्यापेक्षा शिळ्या जिलबीचा तुकडा प्रत्यक्ष खाण्यामध्ये जास्त समाधान आहे. बुद्धीचा आनंद हा उपाधीचा आणि कल्पनेचा आनंद आहे, भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. हा आनंद मिळवायला भगवंताला शरण जाऊन त्याच्या नामात राहणे हा एकच उपाय आहे.

बोधवचन:- नामस्मरणाच्या योगाने आनंदाचा आणि समाधानाचा लाभ सहजी होतो यात शंकाच नाही.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# काँग्रेस, उबाठा बोलतात डौलात, अवस्था, बुडत्याचा पाय खोलात !

**सध्या उद्धव ठाकरे यांचा गट आणि काँग्रेस यांची अवस्था 'बुडत्याचा पाय खोलात' अशी झाली आहे. दोन्हीही पक्ष लंबीचौडी भाषणे देण्यात, अकलेचे तारे तोडण्यात आणि सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल करण्यात सरावलेले आहेत. पण, त्यांची प्रत्येक कृती, त्यांचे वक्तव्य त्यांना आणखीच गाळात घेऊन जात आहे आणि हेच त्यांच्या लक्षात येत नाही !**



### जनमानसाचा कानोसा तर घ्या..

राजकीय पक्षांनी जनमानसाचा कानोसा किंवा कल जाणून घेऊन पावले टाकणे आणि त्यानुसार आपल्या पक्षाच्या धोरणांमध्ये योग्य तो बदल करणे सध्याच्या घडीला आवश्यक आहे. पण, काँग्रेस आणि उबाठा या दोन पक्षांनी नको तो मुद्दा उगाळत बसून स्वतःची परिस्थिती कठीण करुन ठेवली आहे, हे कोणत्याही व्यवहारी माणसाच्या पटकन लक्षात येईल. आपल्या ओळखीचा एखादा माणूस कधीही भेटला आणि तेच ते रटाळ पुराण सांगत राहिला, त्याचा प्रेमभंग कसा झाला आणि त्याचे वाटोळे करुन ती कशी सुखात नांदते आहे, असे सतत बिंबवत राहिला तर आपण त्याला भेटण्याचे टाळतो. तसेच उबाठा च्या संदर्भात झाले आहे, हे लक्षात घ्या.

### मुद्दा तेजस ठाकरेंच्या वाढदिवसाचा..

आज कुठेतरी उबाठा चे तरुण नेते आणि उद्धव यांचे चिरंजीव तेजस ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कोणीतरी पोस्ट टाकली. गंमत म्हणजे गद्दारांना गाडण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. आता, हा गद्दार वगैरे मुद्दा इतका शिळा झाला आहे, की लोकांच्या लक्षात सुद्धा नाही. पण, त्या प्रेमभंग झालेल्या माणसाने वारंवार तेच सांगत राहिल्यावर जी प्रतिक्रिया येते, तशी लोकांची एकंदर प्रक्रिया आहे. विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्या शिवसेनेला ५७ तर उबाठा ला २० जागा मिळाल्या. ही परिस्थिती बदलून उबाठा नव्याने उभी राहात असेल तर स्वागतच आहे. पण, तेच २०२२ सालचे ठसठसत असलेले दुखणे घेऊन लोकांसमोर जाण्यात काय मजा आहे? हे कोणाच्या लक्षात येत कसे नाही, याचे आश्चर्य वाटते !

### यांना कसं काय सुचतं ?

इकडे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षांना मिळून जवळपास शंभर आणि भाजपच्या १३२ एवढ्या जागा असताना एखादे नवे सरकार उभे राहील आणि मग एकेकाला बघून घेऊ, वगैरे कल्पना चांगली आहे. ते भास्कर जाधव कोकणच्या लोकांना बावळट समजून मी मंत्री वगैरे होणार आहे, असे सांगतात. पण ते पक्के कोकणवाले त्यांच्या भाषेत " मेलास तू मंत्री होणारा" म्हणत असतील. अशोक नायगावकर यांच्या भाषेत सांगायचे तर ...यांना कसं काय सुचतं ...असं म्हणायला पाहिजे. या पद्धतीत प्रचार करीत उद्धव ठाकरे दिल्लीत काय अगदी झुमरीतल्लया येथे गेले तरी पक्ष वाढवायला नाही. तेच राज ठाकरे यांच्याशी युती करण्याबाबत उद्धव ठाकरे दोन्ही खिशांमध्ये हात घालून लोकांना ओळख बघू असे म्हणत आहेत, असे वाटते. त्यांनी इतका गोंधळ घालून ठेवला आहे की, यांना मतदान करायचे म्हणजे नेमके बटण कुठले दाबायचे हा मोठा गंभीर प्रश्न बनत चालला आहे.

### राहुल गांधी यांची धमाल..

दुसरीकडे, राहुल गांधी यांनी तर धमाल केली आहे. विमा कंपनीचे अधिकारी नवे एजंट नेमण्यासाठी मेळावा घेताना फळ्यावर बरेच काही समजावून सांगत असतात. तसे राहुल गांधी यांनी निवडणुकीत मतांची चोरी झाली आहे, वगैरे सांगण्याचा प्रयत्न केला. कोणाला किती बोध झाला, ते माहीत नाही, पण जर आगामी निवडणुकीत असेच होणार असेल, तर काँग्रेसने निवडणूक लढवायची कशाला असा प्रश्न निर्माण होतो आणि आम्ही सत्ताधारी झाल्यानंतर निवडणूक अधिकाऱ्यांकडे बघून घेऊ, ही धमकी देऊन फायदा नाही. कारण हे सत्ताधारी होईपर्यंत सगळे अधिकारी निवृत्त झाले असतील, तर करणार काय हा मोठा प्रश्न. या नेत्याच्या अकलेचे कौतुक करावे, तेवढे थोडेच !

### पराभवाचे सोडा पुढे बघा..

एकंदरीत आपल्या राजकीय पक्षांना पराभव पचवून पुन्हा उभे राहण्यासाठी खूप काही करावे लागणार आहे, हे नक्की. उबाठा किंवा काँग्रेस हे पक्ष माझे शत्रू अजिबात नाहीत. पण, एकच मुद्दा चघळत राहणे, आता कधीतरी थांबायला हवे. दूध मर्यादित वेळेपर्यंत उकळले की त्याची बासुंदी होते. पण, आणखी उकळत ठेवले की, गोडी कमी होऊन कडवटपणा येतो, त्याचा खवा किंवा कलाकंद करता येत नाही, कारण त्या रेसिपी वेगळ्या असतात. हे दोन पक्ष पुन्हा कसे उभे राहणार ? हे त्यांनीच ठरवावे !

### खचलेली मानसिकता..

काँग्रेस आणि उबाठा गट पूर्णपणे खचलेले आहेत. प्रतिस्पर्धी भाजपा आघाडीचा धुमधडाका जोरात सुरू आहे. त्यांच्या झंझावाती विकासकामांपुढे या दोन्ही खचलेल्या पक्षांची पुन्हा उभारणी कशी करायची, हा खरा प्रश्न आहे. पराभव हा होईल, किंवा होऊ शकतो..पण, विजयाचे ध्येय गाठण्यासाठी हवी असलेली ऊर्जा, चैतन्य आणि ताकद त्यांनी गमावली आहे, त्याला काय म्हणायचे ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

राजकीय वाद

## नीलेश लंके आणि डॉ. सुजय विखे यांच्यात जुंपली

# वंदे भारतच्या थांब्यावरून राजकीय वाद!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नागपूर-पुणे वंदे भारत रेल्वेला नगर रेल्वे स्थानकावर थांबा मिळाल्याच्या मुद्द्यावरून नगरमध्ये राजकीय श्रेयवादाची लढाई केली जात आहे. प्रत्यक्षात या रेल्वेचा नगरकरांना किती उपयोग होणार, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. नागपूर-पुणे वंदे भारत रेल्वे आठवड्यातून सहा दिवस धावणार आहे. या रेल्वेच्या नगर रेल्वे स्थानकावरील स्वागताचा कार्यक्रम उद्या, रविवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर श्रेयवादाची चढाओढही सुरू झाली आहे.**

## मलाही त्या वादात पडायचे नाही



शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके यांनी २३ जुलैच्या रेल्वे सल्लागार समितीच्या बैठकीत आपण थांबा देण्याची मागणी केली होती, त्याची दखल घेत वंदे भारत एक्स्प्रेसला थांबा देण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. तर अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी नगरला थांबा दिल्याने आपल्या पाठपुराव्याला यश आल्याचा दावा केला आहे.

यासंदर्भात बोलताना माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी म्हटले की, वंदे भारतला नगरच्या रेल्वे स्थानकावर थांबा मिळाला याचे श्रेयवाद कोणी घेऊ नये. मलाही त्या वादात पडायचे नाही. जे श्रेय घेतात त्यांच्या पक्षाच्या नेत्यांनी तर हे केले नाही ना? शरद पवारांनी वंदे भारत चालू केली आहे का? पवारांनी नगरच्या रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण केले आहे का? त्यामुळे श्रेय घ्यायचे त्यांनी घ्यावे, मात्र श्रेय घेताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानावेत व फलकावर मोदी यांचे फोटो लावावेत. मग श्रेय घेतले तरी आमची काही हरकत नसेल. याचे श्रेय सुजय विखेंना नाही केवळ एकाच व्यक्तीला श्रेय जाते ते म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी.

वंदे भारत रेल्वेच्या वेळापत्रकाचा अभ्यास न करताच श्रेय घेण्याचा आनंद व्यक्त केला जात आहे, अशी टीका जागरूक नागरिक मंचचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी केली आहे. नगर-पुणे रस्त्यावरील गंभीर वाहतूक समस्या कोणाला समजलेली नाही. रेल्वे मंत्रालयाकडूनही सावत्र आईसारखे नगरकरांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जाते. वंदे भारतचे वेळापत्रक नगरकरांसाठी गैरसोयीचे आहे.

त्यामुळे ही रेल्वे नगरकरांच्या किती उपयुक्त ठरेल हा प्रश्न आहे. त्याऐवजी पुण्याहून रोज संध्याकाळी नगरला येणारी इंटरसिटी रेल्वे सुरू होणे हाच एकमेव नगर-पुणे मार्गासाठी पर्याय असल्याचा दावाही मुळे यांनी केला आहे.शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके यांनी २३ जुलैच्या रेल्वे सल्लागार समितीच्या बैठकीत आपण थांबा देण्याची मागणी केली होती, त्याची दखल घेत वंदे भारत एक्स्प्रेसला थांबा देण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

तर अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी नगरला थांबा दिल्याने आपल्या पाठपुराव्याला यश आल्याचा दावा केला आहे.यासंदर्भात बोलताना माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी म्हटले की, वंदे भारतला नगरच्या रेल्वे स्थानकावर थांबा मिळाला याचे श्रेयवाद कोणी घेऊ नये. मलाही त्या वादात पडायचे नाही. जे श्रेय घेतात त्यांच्या पक्षाच्या नेत्यांनी तर हे केले नाही ना? शरद पवारांनी वंदे भारत चालू केली आहे का? पवारांनी नगरच्या रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण केले आहे का? त्यामुळे श्रेय घ्यायचे त्यांनी घ्यावे, मात्र श्रेय घेताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानावेत व फलकावर मोदी यांचे फोटो लावावेत. मग श्रेय घेतले तरी आमची काही हरकत नसेल. याचे श्रेय सुजय विखेंना नाही केवळ एकाच व्यक्तीला श्रेय जाते ते म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी. वंदे भारत रेल्वेच्या वेळापत्रकाचा अभ्यास न करताच श्रेय घेण्याचा आनंद व्यक्त केला जात आहे, अशी टीका जागरूक नागरिक मंचचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी केली आहे. नगर-पुणे रस्त्यावरील गंभीर वाहतूक समस्या कोणाला समजलेली नाही.

## अभ्यास न करता श्रेयवाद

रेल्वे मंत्रालयाकडूनही सावत्र आईसारखे नगरकरांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जाते. वंदे भारतचे वेळापत्रक नगरकरांसाठी गैरसोयीचे आहे. त्यामुळे ही रेल्वे नगरकरांच्या किती उपयुक्त ठरेल हा प्रश्न आहे. त्याऐवजी पुण्याहून रोज संध्याकाळी नगरला येणारी इंटरसिटी रेल्वे सुरू होणे हाच एकमेव नगर-पुणे मार्गासाठी पर्याय असल्याचा दावाही मुळे यांनी केला आहे.

# अखेर 'या' धरणात होणार वीजनिर्मिती

## 100 मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी 4.90 हेक्टर राखीव वनजमीन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा धरणात २० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत, तर ८० मेगावॅट क्षमतेचा तरंगता सौरऊर्जा असा एकूण १०० मेगावॅट क्षमतेचा संकरित वीजनिर्मिती प्रकल्प विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासनाने ४.९० हेक्टर राखीव वनजमीन पुनर्वळतीकरणास परवानगी दिली आहे. यामुळे आता संकरित वीजनिर्मिती प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात करण्यात येणार आहे.**



संकरित ऊर्जानिर्मिती क्षेत्रात पाऊल टाकणारी महानगरपालिका ही देशातील पहिलीच महानगरपालिका ठरली आहे.महानगरपालिका आयुक्त व प्रशासक भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करून प्रशासनाने ही परवानगी मिळवली आहे. या प्रकल्पातून दरवर्षी सुमारे २०८ दशलक्ष युनिट ऊर्जानिर्मिती होणार आहे. हा प्रकल्प केवळ मुंबईसाठी नव्हे, तर संपूर्ण देशासाठी हरित ऊर्जेच्या दिशेने एक प्रेरणादायी पाऊल ठरणार आहे. या प्रकल्पाबरोबरच

## सौरऊर्जा निर्मिती अधिक फायदेशीर

या जलाशयातून जलविद्युत निर्मिती करण्यासाठी १२ डिसेंबर २०१९ रोजी मुंबई महानगरपालिकेस परवानगी दिली. त्यानंतर महानगरपालिकेने सल्लागारांची नियुक्ती केली. मोठ्या स्वरूपाची विजेची मागणी पाहता 'संरचना, बांधा, वित्तपुरवठा, वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर जलविद्युत निर्मितीच्या बरोबरीने सौरऊर्जा निर्मिती करणे अधिक फायदेशीर ठरेल.

भविष्यात महानगरपालिकेच्या अन्य जलाशयांवर सौरऊर्जा प्रकल्प विकसित करणे शक्य होईल. महानगरपालिकेने पालघर जिल्ह्यात मोखाडा तालुक्यातील कोचाळे गावात १०२.४ मीटर उंचीचे आणि ५६५ मीटर लांबीचे मध्य वैतरणा धरण बांधून २०१४ मध्ये पूर्ण केले. या धरणाचे 'हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशय' असे नामकरण करण्यात आले आहे. या धरणाच्या निर्मितीच्या वेळीच जलविद्युत प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने पाणीपुरवठा, तसेच जलविद्युत निर्मितीसाठी संयुक्तिक बहिर्गामी जलवाहिनीही टाकण्यात आली

समक्ष चर्चा

## डोनाल्ड ट्रम्प-व्लादिमिर पुतिन भेटीचं भारताकडून स्वागत

# रशिया-युक्रेन युद्ध संपणार?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे १५ ऑगस्ट रोजी अलास्का येथे भेटणार आहेत. या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये समक्ष चर्चा होणार आहे. या भेटीकडे सध्या संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले असताना भारताने या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे. भारत सरकारने ट्रम्प-पुतिन यांच्या भेटीचे स्वागत करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.**

### ट्रम्प स्वतःचा नाश करत आहेत



परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी केले आहे, ज्यामध्ये या बैठकीत युक्रेनमध्ये सुरु असलेला संघर्ष संपवण्याची आणि शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता आहे, असे म्हटले आहे.भारताचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर हे निवेदन पोस्ट केले आहे."१५ ऑगस्ट २०२५ रोजी अलास्का येथे होणाऱ्या बैठकीसाठी अमेरिका आणि रशियन फेडरेशनमध्ये झालेल्या एकमताचे भारत स्वागत करतो," असे परराष्ट्र मंत्रालयाने या निवेदनात म्हटले आहे.या बैठकीमुळे युक्रेनमध्ये सुरू असलेला संघर्ष संपवण्याची आणि शांततेच्या शक्यतांचा मार्ग मोकळा करण्याची आशा निर्माण झाली आहे. "हा युद्धाचा काळ नाही," असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक वेळा म्हटले आहे. म्हणून, भारत या आगामी बैठकीला पाठिंबा देतो आणि या प्रयत्नांना सहकार्य करण्यास तत्पर आहे." असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान या भेटीपूर्वीच ट्रम्प यांनी घोषणा केली आहे की ते रशियाचे अध्यक्ष पुतिन यांना पुढच्या शुक्रवारी अलास्का येथे भेटतील आणि या भेटीमध्ये रशियाचे युक्रेनमधील युद्ध थांबवण्यासाठी चर्चा केली जाईल.

२०२१ नंतर ही पहिलीच रशिया-अमेरिका बैठक असणार आहे. यापूर्वी अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी जिनेव्हा येथे पुतिन यांची भेट घेतली होती. या भेटीबद्दल ट्रम्प यांनी टुथ सोशलवरील एका पोस्टच्या माध्यमातून माहिती दिली होती. "अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून माझी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांची बहुप्रतिक्षित बैठक शुक्रवारी (१५ ऑगस्ट २०२५) अलास्काच्या ग्रेट स्टेटमध्ये होईल," असं ट्रम्प म्हणाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर चर्चेविनाच

### आर्थिक दबावांपुढे झुकणार नाही

"अमेरिकेचा खर्च हा सकल राष्ट्रीय उत्पादनापेक्षा जास्त आहे, त्यामुळे अमेरिकेत मोठी व्यापार तूट असल्याचा दावा प्राध्यापक हँके यांनी केला. त्यामुळेच ट्रम्प यांचे अर्थशास्त्र अतिशय वाईट आहे, असे हँके म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफचा भारताने निषेध केलेला आहे. ही करवाढ अन्यायकारक, अवाजवी असल्याची टीका भारताने केली आहे. भारत या आर्थिक दबावांपुढे झुकणार नाही

एकतर्फी ५० टक्के आयातशुल्क लादले आहे. १ ऑगस्टपूर्वी त्यांनी २५ टक्के आयातशुल्काची अंमलबजावणी केली. त्यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात त्यांनी पुन्हा एकदा अतिरिक्त २५ टक्के कर लादला. भारतापूर्वी ट्रम्प यांनी चीनवरही अशाचप्रकारचा अवाजवी कर लादण्याचा प्रयत्न केला होता. ट्रम्प यांच्या धोरणावर आता अमेरिकेतूनच टीका होऊ लागली आहे. अमेरिकेतील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि जॉन हॉपिकन्स विद्यापीठाचे प्राध्यापक स्टीव्ह हँके यांनी ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे.एनडीटीव्हीशी बोलत असताना स्टीव्ह हँके म्हणाले, "ट्रम्प यांचा टॅरिफ वाढीचा निर्णय हा पूर्णपणे चुकीचा आहे आणि तो दीर्घकाळ टिकणार नाही. त्यांचे अर्थशास्त्र पूर्णपणे गंडले आहे. तसेच व्यापार युद्ध सुरू करून ट्रम्प स्वतःचा नाश करत आहेत."आपल्या विधानासाठी प्राध्यापक हँके यांनी नेपोलियनचे एक वाक्य उद्धृत केले. शत्रू स्वतःचा नाश करत असताना त्यात कधीही हस्तक्षेप करू नका. मला वाटते ट्रम्प स्वतःचाच नाश करत आहेत.भारताबाबत बोलत असताना प्राध्यापक हँके म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी त्यांचे पत्ते राखून ठेवावेत आणि थोडा वेळ वाट पाहावी. मी हे सांगतोय कारण, ट्रम्प यांचे पत्त्यांचे घर (हाऊस ऑफ कार्ड्स) हे काही दिवसांतच कोसळले. टॅरिफचे तुणतुणे अधिक काळ वाजणार नाही.

# जगदीप धनखड राजीनाम्यानंतर बेपत्ता?

## कपिल सिब्बल यांचा थेट अमित शाहांना सवाल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनी शनिवारी माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या ठावठिकाण्याबाबत प्रश्न उपस्थित केले. काही दिवसांपूर्वी धनखड यांनी आरोग्याचे कारण देत अचानक त्यांच्या पदाचा राजीनामा दिला होता. पत्रकार परिषदेत सिब्बल यांनी आपण 'लापता लेडीज' चित्रपटाबद्दल ऐकले होते, पण 'लापता (बेपत्ता) उपराष्ट्रपती' याबद्दल पहिल्यांदाच ऐकतोय असे विधान केले.**



धनखड यांच्या आरोग्याबद्दल वाटत असलेली चिंता कमी करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ते कुठे आहेत? याबद्दल निवेदन द्यावे अशी मागणी देखील सिब्बल यांनी यावेळी केली. सिब्बल म्हणाले की, "२१ जुलै रोजी धनखड यांनी त्यांचा राजीनामा दिला, आज ९ ऑगस्ट आहे आणि त्यांच्याबद्दल आम्हाला माहितीच नाही की ते कुठे आहेत. लापता लेडीज बद्दल तर मला माहिती होतं, लापता उपराष्ट्रपती हे तर पहिल्यांदाच ऐकलं. ते आपले उपराष्ट्रपती होते आणि ज्या पद्धतीने

### मला तर काळजी वाटतेय

त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी देखील काहीच सांगितलं नाही. मग अडचण काय आहे? अशा गोष्टी आपण दुसऱ्या देशांबद्दल ऐकतो, भारत तर एक लोकशाही देश आहे ना? मग याची माहिती लोकांनी मिळाली पाहिजे," असे सिब्बल म्हणाले.सिब्बल पुढे बोलताना म्हणाले की, "माझे त्यांच्याशी वैयक्तिक इतके चांगले संबंध होते, वकील म्हणून देखील एकत्र काम केलं.

त्यांनी सरकारचे संरक्षण केले, आता वाटतंय की विरोधकांना त्यांचे संरक्षण करावे लागेल. धनखड कुठे आहेत?""मी स्वतः त्यांना फोन केला होता आणि त्यांच्या पीएसने फोन उचलला आणि सांगितले की ते आराम करत आहेत. त्यानंतर कोणी फोन उचलतच नाही. माझी अनेक राजकीय नेत्यांशी चर्चा झाली, ते सांगतात की ते देखील फोन करत आहेत. याची माहिती तर गृहमंत्रालयाकडे असेल ना? त्यामुळे अमित शाह यांनी जाहीर निवेदन दिले पाहिजे की ते कुठे आहेत," असेही सिब्बल म्हणाले. त्यांची प्रकृची ठिक नव्हती, असे तर नाही ना की ते कुठेतरी उपचार घेत आहेत?

## अधिपतीचा मोठा गैरसमज!

'तुला शिकवीन चांगलाच धडा' या मालिकेत गेल्या काही दिवसांपासून अक्षरा आणि अधिपती यांच्यात दुरावा आल्याचा सीक्वेन्स चालू आहे. दोघंही मकरसंक्रांतीच्या शुभमुहूर्तावर एकमेकांना भेटण्याचा निर्णय घेतात. पण, ऐनवेळी भुवनेश्वरी अक्षराची बहीण इराला हाताशी घेऊन या दोघांमध्ये गैरसमज निर्माण करणार आहे. अधिपती अक्षराला भेटण्यासाठी तिच्या माहेरी जातो. तर, मास्तरीण बाई आपल्या वडिलांसह सासरी येते. नेमकी याचवेळी दोघांची चुकामूक होते. अधिपती घरी नसल्याने अक्षरा आणि तिच्या वडिलांना सूर्यवंशींच्या घरी अपमान सहन करावा लागतो. पण, अक्षरा यावेळी सासूचा एकही शब्द ऐकून न घेता तिला प्रतिउत्तर देते. अक्षरा आणि भुवनेश्वरी यांच्यात या दरम्यान मोठा वाद होतो. तर, दुसरीकडे इरा आपल्या स्वतःच्याच बहिणीविरोधात अधिपतीचे कान भरते.'ताईचा मित्र परदेशातून आल्यापासून ती खूप आनंदी आहे' असा निरोप ती अधिपतीला देते. आता या विदेशातून आलेल्या अक्षराच्या 'मॅड' मित्राची भूमिका मालिकेत तेजस बर्वे साकारणार आहे.



## दंगल, जाळपोळ अन् मनात प्रेमाचं वादळ

'रांझणा' चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक आनंद एल रॉय आणि अभिनेता धनुष यांची जोडी आणखी एक रोमँटीक ड्रामा 'तेरे इश्क मे' चित्रपट घेऊन येत आहे. या चित्रपटात धनुषबरोबर मुख्य भूमिकेत अभिनेत्री क्रिती सेननसुद्धा दिसणार आहे. नुकताच क्रितीचा या चित्रपटातील पहिला व्हिडीओ समोर आला आहे. हा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.जिथे प्रेमासाठी मनात उत्कंटता असते तिथे कथा वेगळी असते", अशा कॅप्शनसह व्हिडीओ पोस्ट करण्यात आला आहे.

व्हिडीओमध्ये सुरूवातीलाच जाळपोळ आणि दंगल सुरू असल्याचं दिसत आहे. अनेक व्यक्ती हातात लाठ्या काठ्या घेऊन एकमेकांवर धावून येत आहेत. तसेच क्रिती हातात रॉकेल घेऊन या दंगलमधून वाट काढत पुढे चालली आहे.व्हिडीओमध्ये पुढे "तुझं माझ्यावर प्रेम आहे हे मला माहिती आहे. मात्र, हे प्रेम माझ्याही मनात असावं हे गरजेचं तर नाही.

तू रागात संपूर्ण शहर डोक्यावर घेतलंस तरी त्याचं दुःख मलाही व्हावं हे गरजेचं नाही. डायलॉग संपताच क्रिती हातातला रॉकेलचा डब्बा तिच्या डोक्यावर आणि अंगावर ओतून घेते. तसेच एका ठिकाणी बसते आणि ओठांमध्ये सिगरेट पकडते. 'तेरे इश्क मे' या चित्रपटात क्रिती मुक्ती हे पात्र साकारणार आहे.


## खरंच हे खूप धमाल आहे !

अभिनेत्री श्रद्धा कपूरसाठी २०२४ हे वर्ष खूप खास ठरले. याच वर्षी तिच्या 'स्त्री २' या सिनेमाने बॉक्सऑफिसवर रेकॉर्डब्रेक कमाई केली. याचवर्षी तिने तिचा बॉयफ्रेंड राहुल मोदीबरोबरच्या ब्रेकअपच्या बातम्यांना खोट ठरवत त्याच्याबरोबरच्या डेटिंगचे फोटो पोस्ट केले होते. यामुळे गेले वर्ष तिचे व्यावसायिक आणि व्यक्तिगत आयुष्यात खास ठरले. श्रद्धा यशाचे शिखर गाठत असले तरी ती आजही तिच्या कुटुंबीयांबरोबरच राहते. 'स्क्रीन'च्या लॉन्च इव्हेंटदरम्यान श्रद्धाने तिच्या घरातील जवळच्या व्यक्तींबद्दल व्यक्त झाली. स्क्रीनच्या व्यासपीठावर श्रद्धा म्हणाली, "मी अजूनही माझ्या आई-वडिलांबरोबर आणि माझ्या पाळीव प्राण्यांसह राहते, आणि खरंच हे खूप धमाल आहे," कपूर कुटुंबाबद्दल अधिक बोलताना श्रद्धा म्हणाली, "माझ्या आई-वडिलांनी माझं यश-अपयश दोन्ही पाहिलं आहे. त्यांनी मला एक अप्रतिम सपोर्ट सिस्टीम दिल्याबद्दल मी कृतज्ञ आहे.श्रद्धाने पुढे तिच्या घरी असलेल्या नियमांबद्दल सांगितले. ती म्हणाली, "आमच्या घरी एक नियम आहे.



## अंडरवर्ल्डमधून यायचे धमक्यांचे फोन

बॉलीवूड व अंडरवर्ल्डच्या संबंधाबाबत अनेकदा बोलले जाते. प्रसिद्ध दिग्दर्शक राकेश रोशन(RAKESH ROSHAN) यांच्यावर एकदा गोळीबार झाला होता. त्याच्या संबंध अंडरवर्ल्डशी असल्याचे त्यांनी अनेक मुलाखतींमध्ये सांगितले आहे. आता द रोशन्स या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या डॉक्युमेंटरीमध्येदेखील त्यांनी या प्रसंगाचा उल्लेख केला आहे. हृतिक रोशनचा पहिला चित्रपट 'कहो ना प्यार है' हा चांगलाच गाजला होता. पण, हा चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या एक आठवड्यानंतर चित्रपटाचे निर्माते व हृतिक रोशनचे वडील राकेश रोशन यांच्यावर त्यांच्या मुंबईतील ऑफिसबाहेर गोळीबार करण्यात आला होता. हा हल्ला अंडरवर्ल्डमधील काही लोकांनी केला होता. या हल्ल्यापूर्वी राकेश रोशन यांना त्यांच्याकडून धमक्या देण्यात आल्या होत्या.काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत राकेश रोशन यांनी या घटनेबद्दल वक्तव्य केले होते. जेव्हा त्यांच्यावर गोळीबार झाला, तेव्हा त्यांना धक्का बसला होता आणि बराच वेळ गोळी लागल्याची जाणीव झाली नव्हती, असे म्हटले होते.'झूम'शी बोलताना राकेश रोशन यांनी म्हटलेले की गोळीबाराच्या घटनेनंतर ड्रायव्हर हा भीतीने थरथरत होता, त्यामुळे आम्ही लगेचच घटनास्थळावरून बाजूला गेलो आणि एका गल्लीत गाडी थांबवली. मी माझ्या ड्रायव्हरला शांत व्हायला सांगितले. तोपर्यंत मला गोळी लागल्याचेही लक्षात आले नव्हते. त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनकडे निघालो. कारण- गोळीबार करणारे जवळच असतील अशी मला शंका होती. त्यामुळे त्यांना पकडले जाऊ शकते, असे वाटले.याबद्दल अधिक बोलताना राकेश रोशन यांनी म्हटलेले की तोपर्यंत मला माझा शर्ट थोडासा ओला झाल्याचे जाणवले. पुढच्या काही क्षणातच लक्षात आले की रक्त येत आहे.



## उर्वशी रौतेलाने ट्रोल करणाऱ्यांना दिलं उत्तर

बॉलीवूड अभिनेता सैफ अली खानवर काही दिवसांपूर्वी मोठा हल्ला झाला. चोराने सैफच्या राहत्या घरात घुसून त्याच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात सैफ गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर अशा पद्धतीने हल्ला झाल्यावर मनोरंजन विश्वातील अनेक कलाकारांनी आपली प्रतिक्रिया दिली होती. तसेच सैफबद्दल काळजी व्यक्त करत सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले होते. अभिनेत्री उर्वशी रौतेलानेदेखील यावर तिची प्रतिक्रिया दिली होती.मात्र, तिने दिलेली प्रतिक्रिया नेटकऱ्यांना काहीशी खटकली आणि सोशल मीडियावर तिला ट्रोल करण्यास सुरुवात झाली. सध्या उर्वशीला अनेक नेटकरी 'ब्यूटी विदाउट ब्रेन' म्हणून ट्रोल करत आहेत. ट्रोलर्सच्या निशाण्यावर असताना आता अभिनेत्रीने स्वतः यावर आपलं उत्तर दिलं आहे. उर्वशीने नुकतीच 'इन्स्टंट बॉलीवूड'ला मुलाखत दिली. यावेळी तिने ट्रोलर्सला तिच्या अंदाजात उत्तर दिलं आहे.उर्वशीला विचारण्यात आलं की, "तुला सध्या 'ब्यूटी विदाउट ब्रेन' म्हणून ट्रोल करत आहेत." त्यावर उत्तर देत ती म्हणाली, "लोकं असे आहेत की, आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरदेखील टीका करतात. इतकंच नाही तर माझे आवडते कलाकार सलमान खान आणि शाहरूख खान अशा मोठ्या व्यक्तींनासुद्धा लोक सोडत नाहीत; तर आता तुम्हीच सांगा यावर काय करावे."सैफवर झालेल्या हल्ल्यावर उर्वशीने माध्यमांना प्रतिक्रिया दिली होती. तिने तिचं महागडं घड्याळ दाखवल्यावरून तिला ट्रोल केलं जात आहे. त्यावेळी तिने 'एएनआय'ला मुलाखत दिली होती. त्यात ती म्हणाली होती की, "घडलेली घटना अत्यंत वाईट आहे. एकतर 'डाकू महाराज' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर १०५ कोटींचा आकडा पार केला आहे. तसेच माझ्या आईने नुकतेच मला हिऱ्यांनी जडलेलं रॉलेक्स घड्याळ गिफ्ट म्हणून दिलं आहे. माझ्या वडिलांनीसुद्धा मला महागडी वस्तू गिफ्ट म्हणून दिलेली आहे. त्यात सध्या अशा घटना घडत असल्याने इतक्या महागड्या वस्तूंसह आम्ही मोकळेपणाने बाहेर फिरणार कसे?"उर्वशीने दिलेल्या याच प्रतिक्रियेने नेटकऱ्यांनी तिच्यावर जोरदार टीका केली. तसेच अनेक जण तिला 'ब्यूटी विदाउट ब्रेन' असं म्हणू लागले आहेत. उर्वशीने यावर दिलेल्या उत्तरात तिने थेट सलान खान आणि शाहरूख खानचं नाव घेतल्याने आता यावरूनही तिला ट्रोल केलं जात आहे. उर्वशी रौतेला नुकतीच 'डाकू महाराज' या चित्रपटात झळकली. हा एक तेलगू चित्रपट असून बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई करताना दिसत आहे.

इशारा

## ओव्हल कसोटीत अखेरच्या दिवशी काय घडलेलं?

# गिलने धुडकावला मॅच रेफरींचा इशारा!

### अवघ्या ६ धावांनी दणदणीत विजय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ओव्हलच्या मैदानावर झालेल्या अखेरच्या कसोटी सामन्यात भारताने इंग्लंडवर अवघ्या ६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. अखेरच्या दिवशी मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णाच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने यजमान संघाला अवघ्या ३५ धावाही करू दिल्या नाहीत. पण या विजयादरम्यान कोच गौतम गंभीर आणि शुबमन गिल यांनी मॅच रेफरीने दिलेल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करत संघाच्या विजयावर कसा जोर दिला; याचा एक रंजक किस्सा समोर आला आहे.**





ओव्हल कसोटीचा निकाल सामन्याची स्थिती पाहता चौथ्या दिवशीच लागणार असं चित्र स्पष्ट दिसत होतं. पण चौथ्या दिवशी अखेरच्या सत्रात पावसाने जोरदार हजेरी लावली आणि मैदानाचा भाग ओला असल्यामुळे त्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला. यानंतर पाचव्या दिवशी सामना करो या मरो स्थितीत होता.भारताला विजयासाठी ४ विकेट्सची गरज होती, तर इंग्लंडला विजय मिळवण्यासाठी ३५ धावा करायच्या होत्या. मैदानावर मोठं तणावाचं वातावरण होतं, पण तरीही भारताच्या गोलंदाजांनी आणि संपूर्ण संघाने दणदणीत विजय मिळवलाच. पण या विजयादरम्यान मैदानावर जितकी तणावाची स्थिती होती, तितकीच मैदानाबाहेर देखील होती.दैनिक जागरणमधील रिपोर्टनुसार, सामनाधिकारी जेफ क्रो यांनी भारतीय संघाला स्पष्ट सांगितलं की शेवटच्या दिवसाचा खेळ सुरू होण्यापूर्वी ते आवश्यक गतीपेक्षा सहा षटकं मागे आहेत आणि याचे परिणामही गंभीर परिणाम होचे. जर भारत इंग्लंडला सर्वबाद करण्यात आणि ओव्हर रेटची तूट भरून काढण्यात अपयशी ठरला, तर त्यांचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (WTC) गुणतालिकेत चार महत्त्वाचे कापले जाणार होते.नवीन WTC चक्रातील इंग्लंडविरूद्ध भारताची पहिली मालिका होती आणि गेल्या वर्षीच्या अंतिम सामन्यात खेळू न शकल्याने, प्रत्येक गुण हा यंदा महत्त्वाचा आहे. ड्रेसिंग रूममध्ये यासंदर्भात रणनीती बैठक सुरू झाली. गिल, गंभीर, सहाय्यक प्रशिक्षक सितांशू कोटक आणि इतरांनी रणनीतीबाबत चर्चा सुरू केली.अहवालात असं म्हटलं आहे की, ओव्हर रेट सुधारण्यासाठी दोन्ही फिरकीपटू, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांना सुरूवातीला खेळवण्याचा सल्ला देण्यात आला. परंतु सामन्याची स्थिती पाहता हा मोठा धोका होता, कारण इंग्लंडचे जेमी स्मिथ आणि जेमी ओव्हरटन हे मैदानावर सेट झाले होते आणि वेगाने लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी प्रयत्न करत होते.“मला ओव्हर रेटची काही पर्वा नाही, चार गुण गेले तर जाऊ दे. आपण जिंकण्यासाठीच खेळत आहोत,” असं कोच गौतम गंभीर म्हणाल्याचं रिपोर्टमध्ये नमूद केलं आहे. गिलने प्रशिक्षकांच्या मताशी सहमती दर्शवली आणि निर्णय झाला. वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णा आणि मोहम्मद सिराज यांनी ओव्हररेट पेनल्टीची पर्वा न करता दोन्ही बाजूंनी आक्रमण करण्याचं ठरलं. सिराज आणि प्रसिधला गोलंदाजी देणं हा निर्णय अगदी भारताच्या पथ्यावर पडला. सुरूवातीला सिराजने जेमी स्मिथला बाद केलं. ६ धावांची गरज असताना अखेरीस सिराजने एटकिन्सनला बोल्ड करत भारताला रोमहर्षक विजय मिळवून दिला.ओव्हल कसोटीचा निकाल सामन्याची स्थिती पाहता चौथ्या दिवशीच लागणार असं चित्र स्पष्ट दिसत होतं. पण चौथ्या दिवशी अखेरच्या सत्रात पावसाने जोरदार हजेरी लावली आणि मैदानाचा भाग ओला असल्यामुळे त्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला. यानंतर पाचव्या दिवशी सामना करो या मरो स्थितीत होता.भारताला विजयासाठी ४ विकेट्सची गरज होती, तर इंग्लंडला विजय मिळवण्यासाठी ३५ धावा करायच्या होत्या. मैदानावर मोठं तणावाचं वातावरण होतं, पण तरीही भारताच्या गोलंदाजांनी आणि संपूर्ण संघाने दणदणीत विजय मिळवलाच. पण या विजयादरम्यान मैदानावर जितकी तणावाची स्थिती होती, तितकीच मैदानाबाहेर देखील होतीरिजेफ क्रो यांनी भारतीय संघाला स्पष्ट सांगितलं की शेवटच्या दिवसाचा खेळ सुरू होण्यापूर्वी ते आवश्यक गतीपेक्षा सहा षटकं मागे आहेत

### प्रत्येक गुण हा यंदा महत्त्वाचा आहे

आणि याचे परिणामही गंभीर परिणाम होचे. जर भारत इंग्लंडला सर्वबाद करण्यात आणि ओव्हर रेटची तूट भरून काढण्यात अपयशी ठरला, तर त्यांचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (WTC) गुणतालिकेत चार महत्त्वाचे कापले जाणार होते.नवीन WTC चक्रातील इंग्लंडविरूद्ध भारताची पहिली मालिका होती आणि गेल्या वर्षीच्या अंतिम सामन्यात खेळू न शकल्याने, प्रत्येक गुण हा यंदा महत्त्वाचा आहे.

# आझमची क्रिकेटमध्ये विक्रमी कामगिरी

## बाबर आझमची मोठ्या विक्रमात स्टार खेळाडूला टाकलं मागे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तानचा संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील पहिला सामना ब्रायन लारा स्टेडियममध्ये पार पडला. या सामन्यात पाकिस्तानने ५ गडी राखून विजय मिळवला. यासह मालिकेत १-० ने आघाडी घेतली. या सामन्यात बाबर आझमचं अर्धशतक थोडक्यात हुकलं. पण त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये स्टार खेळाडूला मागे सोडलं आहे.**




बाबर आझमने या सामन्यात फलंदाजी करताना ४७ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याचं अर्धशतक अवघा ३ धावांनी हुकलं. दरम्यान आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत शाकिब अल हसनला मागे टाकलं आहे. बाबर आझमने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना आतापर्यंत ३५८ सामन्यातील ३१९ डावात ४६.२० च्या सरासरीने १४७४० धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ३१ शतकं आणि १०२ अर्धशतकं झळकावली आहेत.तर बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू शाकिब अल हसनच्या नावे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४९१ सामन्यातील ४४७ डावात फलंदाजी करताना १४७३० धावा करण्याची नोंद आहे. तो ऑक्टोबर २०२४ मध्ये शेवटचा सामना खेळताना दिसून आला होता. शाकिब अल हसनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १४ शतकं आणि १०० अर्धशतकं झळकावली आहेत.बाबर आझम आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेनंतर पहिल्यांदाच वनडे क्रिकेट खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. बाबर आझमला चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. त्यामुळे त्याला हवी तशी कामगिरी करता करता आली नव्हती.

### १०० अर्धशतकं झळकावली

त्यामुळे त्याला संघाबाहेर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या स्पर्धेनंतर पाकिस्तानचा संघ टी -२० मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. पण या संघात बाबर आझमला संघात स्थान दिलं गेलं नव्हतं. त्यामुळे ही त्याची पुनरागमनाची मालिका होती. पुनरागमन करताच पहिल्याच सामन्यात त्याने ४७ धावांची खेळी केली. त्याला अर्धशतक पूर्ण करून मोठी खेळी करण्याची संधी होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।

। दि. 10 ऑगस्ट 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy**
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.


PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# क्रांती दिन सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन!

## शिक्षण विश्व: संत साई शाळेत शिक्षक व पालकांप्रती कृतज्ञतेची अनोखी भावना

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड: भोसरी येथील संत साई हायस्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही क्रांती दिन सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षी हा सप्ताह "कृतज्ञता वर्ष" म्हणून साजरा करताना, शाळेने शिक्षक व पालक या विद्यार्थ्यांच्या विकासातील दोन महत्त्वाच्या आधारस्तंभांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यावर भर दिला.**



कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व मशाल प्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी-चिंचवड मुख्याध्यापक संघ अध्यक्ष संभाजी पडवळ, मुख्याध्यापक संघ सचिव सुबोध गलांडे, शिक्षिका आशा बोठे उपस्थित होते.

पाहुण्यांची ओळख शिक्षिका मोहिनी नढे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ५ वी चे विद्यार्थी विराट जयस्वाल व जॉर्डन सिंग यांनी तर आभार प्रदर्शन दक्षा सोमवंशी हिने केले.

या निमित्ताने शाळेत पालक-शिक्षक सन्मान समारंभ, कृतज्ञता या विषयावर आधारित गाणी, कविता, नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केल्यापालक व शिक्षकांच्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली

पाहुण्यांनी आपल्या भाषणात पालकांच्या संस्कारांचे व शिक्षकांच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत असे सांगितले की, "घर आणि शाळा हीच खरी कार्यशाळा असून, यामधूनच जबाबदार आणि देशभक्त नागरिक घडतो."या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर, मुख्याध्यापिका सुनीता ढवळेश्वर, उपमुख्याध्यापिका रूपाली खोल्लम , शाळेचे ट्रस्टी पायल ढवळेश्वर, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व पालक-शिक्षक संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत साई हायस्कूलच्या या उपक्रमामुळे शिक्षक व पालक यांचे योगदान नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडले गेले. क्रांती दिनाच्या निमित्ताने साजरा झालेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रप्रेमासोबतच कृतज्ञतेचा भाव जागवणारा ठरला.

# डीपीयू रूग्णालयात हृदयासह मूत्रपिंड एकत्रित प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

## 60 वर्षीय रुग्णाला जीवदान; बहु-अवयव प्रत्यारोपण क्षेत्रातील ही महत्त्वपूर्ण कामगिरी

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी पुणे येथील डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांनी 60 वर्षीय रुग्णावर देशातील पहिली एकाचवेळी हृदयासह मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. बहु-अवयव प्रत्यारोपण क्षेत्रातील ही महत्त्वपूर्ण कामगिरी आहे संबंधित 60 वर्षीय रुग्णाने 2001 मध्ये दीर्घकालीन मूत्रपिंड विकारामुळे मूत्रपिंड प्रत्यारोपण करून घेतले होते.**

मात्र, 2024 मध्ये त्याचे मूळ प्रत्यारोपित मूत्रपिंड निकामी झाले. त्याचबरोबर डायलेटेड कार्डिओमायोपथीमुळे त्याच्या हृदयाचे कार्यही अत्यंत क्षीण झाले होते. डायलिसिस व अनेक औषधांवर अवलंबून असलेल्या या रुग्णाने योग्य उपचारासाठी डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये धाव घेतली. रुग्णाच्या परिस्थितीचे सखोल मूल्यमापन केल्यानंतर, विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा मल्टीडिसिप्लिनरी टीम यांचा सल्ला घेऊन या अत्यंत जोखमीच्या व गुंतागुंतीच्या केसमध्ये शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला.

10 जून 2025 रोजी एका अवयवदात्याच्या साहाय्याने त्याच्यावर एकाच वेळी हृदय आणि पुनः मूत्रपिंड प्रत्यारोपण करण्यात आले. रुग्णावर दोन भिन्न अवयवांचे एकत्रित प्रत्यारोपण झाल्यानंतर, उपचारांचा पुढील टप्पा अत्यंत नाजूक आणि गुंतागुंतीचा होता. दोन्ही



अवयवांची प्रतिकारशक्ती नियंत्रित ठेवण्यासाठी आवश्यक असलेले औषधोपचार वेगवेगळे असल्यामुळे उपचारांत अचूक समन्वय आणि वैद्यकीय दक्षता घेतली.

याबाबत बोलताना डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, कुलपती डॉ. पी. डी. पाटील म्हणाले, “वैद्यकीय विज्ञान आणि रुग्णसेवा यामध्ये प्रगती साधण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण आणि निष्ठावान प्रयत्नांचे हे फलित आहे.

एवढी दुर्मीळ आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल मी डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. भारताच्या वैद्यकीय इतिहासात या शस्त्रक्रियेने एक महत्त्वाचा ठसा उमटवला आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



| | | |
|---|---|---|
| **15k+** Students Placed | **52 LPA** Highest Package | **50,000+** Alumni |
| **1000+** Empanelled Recruiters | | **150+** University Toppers |

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK, wipro, NTT DATA, virtusa, B&R, Emcure, KNORR-BREMSE, NuLife, CitiusTech, SHL, McKinley Rice, bvc, Technouniq, RPG, CONSTROLOGIX, NASSCOM FOUNDATION, INDOVANCE, Tech Mahindra, DataTech Labs, EMERSON, newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."